*बल्लारपुर विधानसभा क्षेत्रातील मोठया पुलांच्या बांधकामासाठी केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत 102.78 कोटी रू. निधी मंजुर*
*अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी मानले केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांचे आभार*
====================================================================

राज्याचे अर्थमंत्री तथा चंद्रपूर जिल्हयाचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केलेल्या मागणीच्या अनुषंगाने केंद्रीय भुपृष्ठ परिवहन मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी बल्लारपुर विधानसभा क्षेत्रातील मोठया पुलांच्या बांधकामासाठी केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत 102.78 कोटी रू. निधी मंजुर केला आहे.

भारत सरकारच्या रस्ते वाहतुक व महामार्ग मंत्रालयाने दि. 8 मार्च 2019 रोजी राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभागाला पत्र पाठवुन सदर पुलांच्या बांधकामांसाठी केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत मंजुर मिळाल्याची माहीती कळविली आहे. यात प्रामुख्याने मुल तालुक्यातील मोरवाही गावाजवळ उमा नदीवर मोठया पुलाच्या बांधकामासाठी 24.39 कोटी रू. निधी, मुल तालुक्यातील डोंगरगाव या गावाजवळ उमा नदीवर मोठया पुलाच्या बांधकामासाठी 21.83 कोटी रू. निधी तर विसापुर-कोलगाव रस्त्यावर वर्धा नदीवर मोठया पुलाच्या बांधकामासाठी 56.56 कोटी रू. निधी मंजुर करण्यात आला आहे.
यापुर्वीही केंद्रीय भुपृष्ठ परिवहन मंत्री श्री. नितीन गडकरी यांनी अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या विनंतीला मान देत केंद्रीय मार्ग निधी अंतर्गत मोठया प्रमाणावर निधी चंद्रपूर जिल्हयासाठी मंजुर केला आहे. या मोठया पुलांच्या बांधकामामुळे मुल व बल्लारपुर तालुक्यातील दळणवळणाचा मोठा प्रश्न निकाली निघणार आहे. अर्थमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केंद्रीय मंत्री श्री. नितीन गडकरी यांचे आभार व्यक्त केले आहे.